पुणे महानगरपालिका

*** शहर सुधारणा समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक – १७

शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दि. १०/१२/२०१० रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

विषय क्रं. ९९

पुणे शहर जुन्या हद्दीच्या मंजुर विकास आराखड्याचे पुनरावलोकनाचे अनुषंगाने एम. आर. टी. पी. ॲक्ट – १९६६ च्या कलम २६ अन्वये प्रारुप विकास आराखडा तयार करुन प्रसिध्द करण्याकरीता शासनाकडून मुदतवाढ घेण्याबाबत मा. महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/न.अ./७८९, दिनांक २९/११/२०१० चे पत्र.

विषय क्रं. १००

स. नं. १६५ अ हडपसर येथे राजर्षी शाहू महाराज स्मारक बांधणे या कामास र. रु. २६,००,००,३६०/– खर्च अपेक्षित असल्याने व सद्यस्थितीत पुरेशी तरतुद उपलब्ध नसल्याने मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७२ (ब) अन्वये अपेक्षित खर्चाचे दायीत्व स्विकृतीस मान्यता मिळणेबाबत मा. महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/भवन/७९०, दिनांक २९/११/२०१० चे पत्र.

विषय क्रं. १०१

येरवडा स. नं. १०४(पै) व १०५(पै) या मिळकतीवरील प्राथमिक शाळा (पी. एस. ८१) व पार्क (पी के १३) ची आरक्षणे एम. आर. टी. पी. ॲक्ट – १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये वगळुन निवासी झोन करणेबाबत मा. महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/न.अ./८००, दिनांक २/१२/२०१० चे पत्र.

विषय क्रं. १०२

पुणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये धार्मिक स्थळांना अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक काही अटींवर अनुज्ञेय करणेबाबत एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७ (१) अन्वयेची कार्यवाही करणेबाबत मा. महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/न.अ./६९६, दि. २५/१०/२०१० चे पत्र.

(टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

विषय क्रं. १०३

पुणे मनपाच्या भवन रचना विभागाकडे गवंडी वर्ग – ४ (वेतन श्रेणी रू.५२०० – २०२०० + ग्रेड पे + मान्य भत्ते) या पदावरील नेमणूकीबाबत मा. अति. महा. आयुक्त (वि) यांचे जा. क्र. मआ/उआ/से/७१३, दि. २५/१०/२०१० चे पत्र.

(टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

<u>विषय क्रं. १०४</u>

विकास नियंत्रण नियमावली,पुणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) (अे अे) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेल्या सुचनेनुसारचा मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र. १६ वाहनतळाबाबतच्या नियमातील टेबल क्र.६ मधील फेरबदलाचा प्रस्ताव बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/न.अ./६३४, दि. ११/१०/२०१० चे पत्र.

(टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

<u>विषय क्रं. १०५</u>

पुणे महानगरपालिका क्षेत्रासाठी वॉटर शेड्स व स्टॉर्म वॉटर व्यवस्थापनबाबतचा मे.प्रायमुव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सलटंट प्रा.लि.यांनी तयार केलेला अहवाल मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.मुख्य सभेचे निदर्शनास आणून देणेबाबत मा. अति. महा. आयुक्त (वि) यांचे जा. क्र. मआ/अ.न.अ. (पथ)/५९८, दि. ११/१०/२०१० चे पत्र.

(टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.